


दैनिक

अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com

खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला
फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स
एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here

वर्ष : ०५ | अंक : २५२, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, शुक्रवार, दि.२४ एप्रिल २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

## २४ ते २५ एप्रिलदरम्यान वादळी पावसाचा 'येलो अलर्ट'; नागरिकांनी सतर्क राहावे




**अक्षराज : प्रमोद डफळ**

**दि.२३, अहिल्यानगर :** भारतीय हवामान विभाग यांनी दिलेल्या अंदाजानुसार जिल्ह्यात दि. २४ ते २५ एप्रिल २०२६ या कालावधीत काही ठिकाणी जोरदार वाऱ्यासह हलका ते मध्यम पाऊस व विजांचा कडकडाट होण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर जिल्ह्यासाठी 'येलो अलर्ट' जारी करण्यात आला असून नागरिकांनी आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी दादासाहेब गिते यांनी केले आहे.

मेघगर्जना व वादळी वाऱ्याच्या वेळी झाडाखाली किंवा झाडाजवळ उभे राहू नये, तसेच वीजवाहक तारांपासून सुरक्षित अंतर राखावे. घराबाहेर पडताना इलेक्ट्रॉनिक उपकरणांचा वापर टाळावा आणि लोखंडी वस्तूंशी संपर्क टाळण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

मोकळ्या मैदानात, शेतात किंवा उंच ठिकाणी उभे राहणे टाळावे. विजेचे खांब, ट्रान्सफॉर्मर, टॉवर, तसेच धातूच्या कुंपणांपासून दूर राहण्याचेही आवाहन प्रशासनाने केले आहे. घरावरील सैल पत्रे, होर्डिंग्ज व झाडांच्या फांद्या सुरक्षित करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

वीज कडकडाटाच्या वेळी सुरक्षित ठिकाणी आसरा घ्यावा. अत्यावश्यक असल्यास जमिनीवर बसताना गुडघे वाकवून डोके खाली ठेवावे व जमिनीशी थेट संपर्क कमी ठेवण्याचा सल्ला देण्यात आला आहे.

धरण, नदी, नाले परिसरात जाणाऱ्या नागरिकांनी विशेष काळजी घ्यावी. पाण्याच्या प्रवाहात उतरू नये तसेच धोकादायक ठिकाणी सेल्फी घेणे टाळावे. शेतकऱ्यांनी पिकांचे संरक्षण करण्यासाठी योग्य नियोजन करावे, असेही आवाहन करण्यात आले आहे.

जनावरांना सुरक्षित ठिकाणी हलवावे आणि शेतमालाची योग्य काळजी घ्यावी, जेणेकरून वादळी वाऱ्यामुळे होणारे नुकसान टाळता येईल.

आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांनी तात्काळ स्थानिक प्रशासन, पोलीस ठाणे किंवा जिल्हा नियंत्रण कक्षाशी संपर्क साधावा. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, अहिल्यानगर येथे दूरध्वनी क्रमांक १०७७, ०२४१-२३५६९४० व २३२३८४४ यावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## 'उद्धव ठाकरे महाविकास आघाडीचा चेहरा', हर्षवर्धन सपकाळ यांचं सूचक वक्तव्य

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२३, मुंबई :** विधान परिषदेच्या ९ जागांसाठी नियमित निवडणूक पार पडणार आहे. तर एका जागेसाठी पोटनिवडणूक पार पडणार आहे. काँग्रेसमधून भाजपात प्रवेश केलेल्या प्रज्ञा सातव यांनी आपल्या विधान परिषदेच्या जागेचा राजीनामा दिला होता. त्यामुळे त्यांची जागा रिक्त झाली आहे. भाजपात प्रवेश केल्यानंतर या निवडणुकीत प्रज्ञा सातव यांना उमेदवारी मिळण्याची शक्यता आहे. ९ जागांची निवडणूक आणि एका जागेची पोटनिवडणूक या दोन्ही निवडणुकांसाठी एकाच दिवशी १२ मे रोजी मतदान होणार आहे. पण आमदारांना दोन वेळा मतदान करावं लागणार आहे. आमदारांना ९ जागांच्या नियमित निवडणुकीसाठी मतदान करावं लागेल. तसेच पोटनिवडणुकीच्या एका जागेसाठीदेखील मतदान करावं लागणार आहे.

पक्षीय बलाबल पाहता विधान परिषदेच्या १० जागांच्या या निवडणुकीत महाविकास आघाडीच्या वाटेला केवळ एक जागा मिळणार आहे. त्यामुळे महाविकास आघाडीकडून कुणाला विधान परिषदेत संधी मिळते? ते पाहणं महत्त्वाचं आहे. याआधी राज्यसभेच्या निवडणुकीत ज्येष्ठ नेते शरद पवार यांना शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने पाठिंबा दिला होता. त्यावेळी काँग्रेसला निवडणूक लढायची होती. पण शरद पवार इच्छुक असल्याचं वृत्त



समोर आल्यानंतर काँग्रेस पक्ष बॅकफूटला गेला होता.

दरम्यान, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी पुन्हा विधान परिषदेत जावं, अशी भूमिका शरद पवार यांनी याधीच व्यक्त केलेली आहे. विशेष म्हणजे शरद पवार यांनी भर पत्रकार परिषदेत याबाबत भूमिका मांडली होती. उद्धव ठाकरे यांनी आपल्या उमेदवारीला पाठिंबा दिला होता. त्यामुळे आपणही त्यांच्या उमेदवारीला पाठिंबा द्यावा, अशी आपली भूमिका असल्याचं शरद पवारांनी पत्रकार परिषदेत म्हटलं होतं.

असं असलं तरी उद्धव ठाकरे हे विधान परिषदेत जाण्यासाठी इच्छुक आहेत की नाहीत? हा एक महत्त्वाचा प्रश्न आहे. उद्धव ठाकरे इच्छूक नसतील तर त्यांच्या जागेवर आपल्याला संधी मिळावी यासाठी त्यांच्या पक्षातील नेत्यांकडून जोरदार लॉबिंग सुरु असल्याची चर्चा आहे. पण महाविकास आघाडीच्या मित्रपक्षांची उद्धव ठाकरे यांनीच पुन्हा विधान परिषदेत जावं, अशी भूमिका आहे. उद्धव ठाकरे यांच्या ऐवजी इतर कुणाला उमेदवारी मिळाली तर भाजपकडून निवडणुकीत आणखी एक उमेदवार दिला जाऊ शकतो आणि मविआच्या आमदारांकडून केल्या जाणाऱ्या मतदानात दगाफटका होऊ शकतो, अशी देखील राजकीय वर्तुळात चर्चा आहे.

या शक्यता लक्षात घेता उद्धव ठाकरे यांनीच विधान परिषदेची उमेदवारी लढवावी, असं शरद पवारांच्या राष्ट्रवादीची आणि काँग्रेसची भूमिका आहे. तसेच उद्धव ठाकरे निवडणूक लढणार नसतील तर मग काँग्रेसच्या उमेदवाराला संधी मिळावी, अशी भूमिका काँग्रेसची आहे. या विषयावर चर्चा करण्यासाठी आज उद्धव ठाकरे यांच्या मातोश्री निवास्थानी आज महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीत काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ उपस्थित होते. या बैठकीनंतर हर्षवर्धन सपकाळ यांनी सूचक वक्तव्य केलं आहे. तसेच खासदार सुप्रिया सुळे यांनीदेखील महत्त्वाचं वक्तव्य केलं आहे.

**हर्षवर्धन सपकाळ नेमकं काय म्हणाले?**

काँग्रेस पक्षाने घेतलेली भूमिका ही आपल्या सर्वांच्या समोर आहे. राज्यसभेच्या निवडणुकीच्या आधीपासून आम्ही सांगत आलो आहोत. राज्यसभेची निवडणूक संपन्न झाली आहे. त्यावेळेस काँग्रेस लढू शकली नाही ही वस्तुस्थिती आहे. मात्र उद्धव ठाकरे हे महाविकास आघाडीचा चेहरा आहेत. ते विधान परिषदेत जात असतील तर निश्चित आनंद होईल हे यापूर्वीच सांगितलेले आहे, अशी प्रतिक्रिया हर्षवर्धन सपकाळ यांनी दिली.

**सुप्रिया सुळे काय म्हणाल्या?**

महाराष्ट्रात विधानपरिषदेची निवडणूक होऊ घातलेली आहे. ही निवडणूक राज्याचे माजी मुख्यमंत्री उद्धवजी ठाकरे यांनीच लढावी अशी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची आग्रहाची विनंती आहे. उद्धवजी हे राज्यातील ज्येष्ठ आणि अनुभवी नेते आहेत. त्यांच्या अनुभवाचा राज्याला तसेच सभागृहाला सदैव फायदाच होत राहील, असा आम्हा सर्वांना विश्वास आहे. उद्धवजींनी या मागणीचा सकारात्मक विचार करावा ही नम्र विनंती, अशी भूमिका सुप्रिया सुळे यांनी मांडली.

## चंद्रपुरात ८.०१५ किलो अंमली पदार्थासह एका आंतरराज्यीय तस्कराला अटक



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२३, चंद्रपूर :** अंमली पदार्थांविरोधातील मोहिमेत स्थानिक गुन्हे शाखेने (एलसीबी) मोठी कारवाई करत ८.०१५ किलो गांजासह एका आंतरराज्यीय तस्कराला अटक केली. ही कारवाई कुंदन प्लाझा चौक, नागपूर रोड परिसरात सापळा रचून करण्यात आली. मिळालेल्या माहितीनुसार, २२ एप्रिल २०२६ रोजी रात्री पोलीस उपनिरीक्षक विनोद भुरले व त्यांच्या पथकाला गुप्त माहिती मिळाली होती की, एक व्यक्ती ओडिशा राज्यातून गांजाची खेप घेऊन चंद्रपूर शहरात विक्रीसाठी येणार आहे. या माहितीच्या आधारे पोलिसांनी कुंदन प्लाझा चौक येथे नाकाबंदी करून सापळा रचला. दरम्यान, पहाटे सुमारे २ वाजताच्या सुमारास संशयित इसम प्लास्टिकची पिशवी घेऊन येताना दिसून आला. पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन पंचांसमक्ष झडती घेतली असता त्याच्याकडे ८.०१५ किलो वजनाचा ओला गांजा (पाने, फुले व बिया) आढळून आला.

अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव शहादेव ठाकूरदास मलिक (५३, रा. ठाकूरनगर, ता. चामोर्शी, जि. गडचिरोली, सध्या रा. राष्ट्रवादी नगर, चंद्रपूर) असे आहे. आरोपीकडून सुमारे २ लाख रुपये किमतीचा गांजा तसेच एक जुना इन्फिनिक्स कंपनीचा मोबाईल असा एकूण २ लाख १० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. प्राथमिक चौकशीत आरोपीने हा गांजा ओडिशा राज्यातून तस्करी करून आणल्याची कबुली दिली असल्याची माहिती पोलिसांनी दिली. या प्रकरणी रामनगर पोलीस ठाण्यात अमली औषधी द्रव्ये व मनोव्यापारावर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम (एनडीपीएस ॲक्ट) १९८५ मधील कलम ८(क), २०(ब)(ळळ)(ब) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास रामनगर पोलीस करीत आहे.

सदर कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक अमोल काचोरे यांच्या नेतृत्वात पो.उपनि. विनोद भुरले, पो.उपनि. सुनील गौरकार, पोहवा सुभाष गोहोकार, सतीश अवथरे, रजनिकांत पुठ्ठावार, दीपक डोंगरे, इम्रान खान, पोअं/हिरालाल गुप्ता, किशोर वाकाटे, शशांक बदामवार यांनी केले.

## 'कोण होता शिवाजी?' पुस्तकाच्या प्रकाशकाला फोन करुन धमकी, संजय गायकवाड म्हणाले

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२३, बुलढाणा :** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे आमदार संजय गायकवाड यांची फोनवरील संभाषणाची ऑडिओ क्लिप व्हायरल झाली आहे. या ऑडिओ क्लिपमध्ये ते 'कोण होता शिवाजी?' पुस्तकाच्या प्रकाशकाला धमकी आणि अर्वाच्या भाषेत शिवीगाळ करताना दिसत आहेत. पुस्तकाचं नाव एकरी असल्याचे कारण देत संजय गायकवाड यांनी पुस्तकाचे प्रकाशक प्रशांत आंबी यांच्यावर तोंडसुख घेतलं. त्यांनी अतिशय खालच्या दर्जाची भाषा वापरुन प्रशांत आंबी यांना मारहाण करण्याची धमकी दिल्याचं कथित ऑडिओ क्लिपमध्ये दिसत आहे. त्यांच्या भाषेबद्दल सर्वत्र टीकेची झोड उठत आहे. या प्रकरणावरुन राजकारण तापल्यानंतर संजय गायकवाड यांनी स्पष्टीकरण दिलं आहे. आपल्याला प्रशांत आंबी यांनी डिवचल्यामुळे आपण त्यांना शिवीगाळ केल्याचा त्यांचा दावा आहे. पण ऑडिओ क्लिपनुसार प्रशांत आंबी हे अत्यंत शांत, संयम आणि विनम्रपणे संजय गायकवाड यांचा प्रतिकार करताना दिसले आहेत.


**संजय गायकवाड यांचं स्पष्टीकरण काय?**

एक ऑडिओ क्लिप व्हायरल झाली आहे. त्या ऑडिओ क्लिपला मोडूनतोडून, त्यामधील काही शब्द वगळून काही शब्द ठेवून व्हायरल करण्यात आले. माझ्या पत्नीला २१ तारखेला एका कार्यक्रमात कुणीतरी शिवाजी कोण होता? हे पुस्तक गिफ्ट दिलं. मी हे पुस्तक वाचलं. हे वाचल्यानंतर छत्रपती शिवाजी महाराजांचा गौरवशाली इतिहास आहे. त्या इतिहासाली छेडछाड करुन प्रत्येक पानावर शिवाजी कोण होता? शिवाजी महाराज क्षत्रिय होते की नव्हते? मराठा होते की नव्हते? अशा प्रकारचे अनेक बेछुट प्रश्न उच्चारलेले आहेत. त्यामुळे त्याला मी फोन केला, असं संजय गायकवाड म्हणाले.

फोन केल्यानंतर त्याला मी म्हटलं की, प्रकाश भाऊ हे पुस्तक तुम्ही लिहिलेलं आहे का? तो म्हणाला, मी प्रकाशन केलं आहे. मी म्हटलं, छत्रपती शिवाजी महाराजांना शिवाजी कोण होता? हे का लिहिलं? ते म्हणाले, पुस्तक फार जुनं आहे. अमूक-अमूकने ते पुस्तक लिहिलं आहे. ते कोणीही लिहू दे. पण प्रकाशन कुणी केलंय? प्रकाशन करताना तुम्ही पुस्तकाच्या नावाचा उल्लेख छत्रपती शिवाजी महाराज का केला नाही?, असं गायकवाड म्हणाले.

शिवाजी महाराजांची वारंवार महाराष्ट्रात विटंबना केली जाते. बोलता-बोलता तो म्हणाला की, मी ब्राह्मण आहे म्हणून तुम्ही मला असं बोलताय. मी त्याला म्हटलं, तू ब्राह्मण आहेस का? असा प्रश्न विचारला का? तो म्हणे, गोविंद पानसरे. मी म्हटलं, मला काय म्हणायचं आहे गोविंद पानसरे यांच्याशी. ते वर गेले, जा तिकडे तू. या पद्धतीने त्याने मुजोरी ठेवली. मला त्याला विचारत असताना त्याने डिवचलं त्यामुळे मी त्याला शिवीगाळ केली. त्याला मी जीभ हासळायची असं म्हटलं. शंभर टक्के अशा माणसाची जीभ हासळलीच पाहिजे. आम्ही या महाराष्ट्रात शिवरायांचा अपमान सहन करु शकत. अशी पुस्तकं नष्ट केली पाहिजेत, अशी प्रतिक्रिया संजय गायकवाड यांनी दिली.

**प्रकाशक प्रकाश आंबी काय म्हणाले?**




दरम्यान, शिवाजी कोण होता? पुस्तकाचे प्रकाशक प्रकाश आंबी यांनी या ऑडिओ क्लिपवर आता प्रतिक्रिया दिली आहे. २०१७ पासून प्रशांत आंबी हे शिवाजी कोण होता? या पुस्तकाचे प्रकाशन करतात. या पुस्तकाचे एकूण तीन प्रकाशक आहेत. त्यापैकी एक संघर्षा प्रकाशन आहे. या संघर्षा प्रकाशनचे प्रकाशक प्रशांत आंबी आहेत. शिवाजी कोण होता? या पुस्तक प्रकाशकाला आमदार संजय गायकवाड यांनी शिवीगाळ केली. त्यांनी मध्यरात्री फोन करून धमकी आणि शिवीगाळ केली. गायकवाड यांनी हा त्यांचाच आवाज असल्याचं कबूल केलं आहे, असं प्रशांत आंबी म्हणाले.

विकृत मानसिकतेच्या आमदारावर आज गुन्हा दाखल करणार आहे, असं प्रकाश आंबी म्हणाले आहेत. तर या प्रकरणी कायदेशीर कारवाई करणार असल्याचं कॉ. गोविंद पानसरे यांच्या स्नुषा मेघा पानसरेंनी स्पष्ट केलं आहे. कॉम्रेड गोविंद पानसरे यांच्या कन्या स्मिता पानसरे यांनी 'एकीकडे महायुती सरकार महिलांसाठी योजना आणत आहे आणि दुसरीकडे याच सरकारमधील सत्तेतील आमदार अशी भाषा वापरत आहेत. ही सरकारची दुटप्पी भूमिका आहे, अशी टीका केली आहे.

**काँग्रेस प्रदेशाध्यक्षांचा संजय गायकवाडांवर निशाणा**

काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी संजय गायकवाड यांच्यावर निशाणा साधला आहे. बुलढाणा जिल्ह्याचे नाव बदनाम करण्याचा विडाच आमदार संजय गायकवाड या व्यक्तीने उचललाय. मग ते आमदार निवासातील कँटीन मधे हाणामारी करणे असो, सुरक्षेसाठी असणाऱ्या पोलिसांना स्वतःची गाडी धुवायला सांगणे असो की आता प्रशांत आंबी यांना धमकी असो, असं हर्षवर्धन सपकाळ म्हणाले. राज्यातील एक लोकप्रतिनिधी, सत्ताधारी पक्षातील आमदार, शिवरायांचा वंशज म्हणवून घेणाऱ्या या व्यक्तीची भाषा आणि शिव्यांची पातळी बघीतली तर छत्रपती शिवाजी महाराजांचे नावही यांच्या ओठावर असू नये, कारण ती लायकी यांची नाही. महाराजांनी या भूमीला घालून दिलेले संस्कार भ्रष्ट करण्याचे, महाराष्ट्राची संस्कृती नासवण्याचे, महाराष्ट्राचा पुरोगामी विचार पुसण्याचे काम यांच्यासारख्या विकृत व्यक्तींमुळे होते आहे, अशी टीका हर्षवर्धन सपकाळ यांनी केली.




## मराठीचा पैस विस्तारण्यासाठी

जगात वाचन, लेखन, प्रकाशन आणि बौद्धिक स्वातंत्र्य यांचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी २३ एप्रिल रोजी पुस्तक दिन साजरा केला जातो. आपण वाचनाबाबत किती समृद्ध आहोत हे पडताळण्याचा हा दिवस. जगात मराठी ही सर्वाधिक बोलल्या जाणाऱ्या भाषेत दहाव्या क्रमांकावर आहे. आज शंभरहून अधिक देशांत पुस्तक दिन साजरा होत असताना मराठी साहित्य जागतिक स्तरावर जाण्यात अजूनही का कमी पडते आहे, याचा गंभीरपणे विचार व्हायला हवा.

एकीकडे मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला आहे, तर दुसरीकडे अनेकांना मराठी बोलण्याचाही न्यूनगंड वाटतो. फ्रेंच, जर्मन, जपानी अशा भाषा निवडणाऱ्या विद्यार्थ्यांना मराठी शिकल्याने पोट भरू शकेल का, हा प्रश्न पडतो. म्हणूनच सरकारलाही मराठी विषय 'सक्तीचा' करावा लागतो.

मराठीत शेकड्याने पुस्तके प्रकाशित होत असतात. संमेलनांतून, ग्रंथप्रदर्शनातून कोट्यवधी रुपयांच्या पुस्तकविक्रीचे आकडे येतात; मात्र दर्जाचे काय? या शेकडो पुस्तकांत हाताच्या बोटावर मोजता यावीत, इतकीच पुस्तके काळाच्या पटावर टिकून राहतात. याबाबत राम शेवाळकर म्हणाले होते, 'दारूच्या दुकानावर कुणाला निमंत्रण द्यावे लागत नाही. तिथे कायम गर्दी असते; दूधवाल्याला मात्र घरोघर जाऊन दूध विकावे लागते.' मध्यमवर्गीय मराठी कुटुंब वीकएंडला हॉटेलात चार-दोन हजार रुपये सहज खर्च करते, मात्र शे-पाचशे रुपयांचे दर्जेदार पुस्तक घेताना ते विचार करतात, हे तसेच काहीसे आहे. १९०९च्या सुमारास पुण्यात एक परिसंवाद झाला होता. विषय होता मराठी भाषा मृतावस्थेला जात आहे काय? अध्यक्ष होते इतिहासाचार्य वि. का. राजवाडे. ते म्हणाले, 'अरे भाषा मृतावस्थेला जातेय का, या विषयावर चर्चा कसली करता? आज भाषा मेली असे आपण जाहीर करू या! ही सभा थांबवून आपण ओंकारेश्वरच्या घाटावर निघू आणि भाषेचा तर्पणविधी साजरा करून श्रद्धांजली देऊ! आणि भाषा मेली नसेल, तिच्यात थोडी जरी धुगधुगी शिल्लक असेल तर एकच करू या, सतत मराठी बोलू या, मराठी लिहू या. इतके काम केले तरी भाषा हजारो वर्ष तंदुरुस्त राहू शकते.' या घटनेला सव्वाशे वर्षे उलटून गेली. आजही आपण मराठी भाषेच्या भवितव्याची चिंता करतो आणि अशाच विषयावर चर्चा घडवून आणतो. मराठी साहित्यातील सर्वांत मोठी समस्या कोणती? तर भाषेला लागलेले प्रतिसादशून्यतेचे ग्रहण! 'एक वेळ माझे साहित्य बाजूला ठेवा, पण हा नवोदित लेखक चांगले लिहितो, त्याचे वाचा' असं सांगणारे किती लेखक आजच्या साहित्यविश्वात आहेत? शिवाजी सावंत यांच्या 'मृत्युंजय'ला प्रकाशकच मिळत नव्हता. तेव्हा गदिमांनी कॉन्टिनेंटलचे अनंतराव कुलकर्णी यांना फोन केला आणि सांगितले, 'मुलगी नाकीडोळी नीट आहे, तुम्ही करून घ्यायला हरकत नाही.' पुढे 'मृत्युंजय'च्या यशाची आपल्याला कल्पना आहेच. तसेच कुसुमाग्रजांचेही. त्यांचा 'विशाखा' हा कवितासंग्रह प्रकाशित व्हावा म्हणून भाऊसाहेब खांडेकरांनी पुढाकार घेतला. तो घेतला नसता तर हे अग्निसंप्रदायी काव्य वाचकांपुढे आलेच नसते. या संग्रहाने सामान्य माणसाला संघर्ष करण्याची, लढण्याची जिद्द दिली. आज असे गदिमा, असे खांडेकर आजूबाजूला दिसतात का? मराठी साहित्याला दुसरा धोका आहे तो गलेलठ्ठ पगार असलेले प्रशासकीय अधिकारी, शिक्षक आणि प्राध्यापकांचा. त्यांचे खूषमस्करे त्यांच्या सुमार साहित्याचे वारेमाप कौतुक करतात. त्यांची पुस्तके प्रकाशित व्हावीत म्हणून त्यांना भरीस घालतात. मग एखादा प्रकाशक गाठून, त्याला हवे तितके पैसे देऊन पुस्तक प्रकाशित केले जाते. साहेबांचा दरारा असा असतो की त्याला पुरस्कारही मिळतात.

आपण कसे उत्तम साहित्यिक आहोत असा भास निर्माण करत सामाजिक प्रतिष्ठा जपण्याचा प्रयत्न केला जातो. ही सुमार पुस्तके वाचकांपर्यंत गेली की त्यांचा भ्रमनिरास होतो आणि अनेकदा ते वाचनप्रक्रियेपासूनही दूर जातात. याला काही अपवाद नक्की आहेत, नाही असे नाही. पण मराठीतील प्रकाशित होणारी पुस्तके बघितली तर हे सत्य कोणीही नाकारू शकत नाही. सध्या विश्व मराठी संमेलन असेल किंवा अनेक विभागीय संमेलने असतील, अशा कार्यक्रमांचे पेवच फुटले आहे. नेत्यांना, आयोजकांना त्यातून मिरवता येते. कार्यक्रमांचा घाट घातला जातो. जवळच्या लोकांना त्यात सामावून घेतले जाते. चार-दोन दिवसांत सरकारी तिजोरीतून कोट्यवधी रुपयांचा चुराडा होतो. त्यातून समाजाला, साहित्याला काय मिळते? त्यापेक्षा हा निधी ग्रंथालयांकडे वळवला आणि ती आणखी समृद्ध केली तर कायमस्वरूपी चांगली पुस्तके उपलब्ध होतील. मराठीत उत्तम समीक्षा करणारे समीक्षकही कालबाह्य झाले आहेत. ललित, सैद्धान्तिक समीक्षा दिसतच नाही. पुस्तकांचे परिचय लिहिणाऱ्यांना समीक्षक मानण्याचे दिवस आले आहेत. ते त्यांचे हितसंबंध जपत काही पुस्तकांचा परिचय करून देतात आणि ही गाजवलेली रद्दड पुस्तकेच मराठी साहित्याचे आजचे प्रतिबिंब असल्याचे चित्र निर्माण केले जाते.

**- घनश्याम पाटील**

# पंचायती राज : तळागाळातील लोकशाहीचा पाया



**- डॉ.राजेंद्र बगाटे (लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**


भारताची लोकशाही ही केवळ निवडणुकांच्या चौकटीत मर्यादित न राहता ती समाजाच्या तळागाळात रुजलेली, प्रत्येक नागरिकाच्या सहभागातून साकार होणारी एक सजीव व्यवस्था आहे. या व्यवस्थेचे सर्वात भक्कम अधिष्ठान म्हणजे स्थानिक स्वराज्य संस्था आणि त्या संस्थांच्या केंद्रस्थानी असलेली पंचायती राज प्रणाली होय. दरवर्षी २४ एप्रिल रोजी साजरा केला जाणारा 'राष्ट्रीय पंचायती राज दिन' हा या व्यवस्थेच्या ऐतिहासिक वाटचालीचे, तिच्या कार्यक्षमतेचे आणि लोकशाहीतील तिच्या अनन्यसाधारण योगदानाचे स्मरण करून देणारा अत्यंत महत्त्वपूर्ण दिवस आहे. हा दिवस केवळ उत्सव म्हणून साजरा करण्यापुरता मर्यादित नसून स्थानिक लोकशाही अधिक सक्षम, पारदर्शक आणि उत्तरदायी बनवण्याचा एक सामूहिक संकल्प व्यक्त करण्याची संधी देतो.

भारतीय संस्कृतीच्या पायाभूत रचनेत 'ग्राम' ही संकल्पना केंद्रस्थानी आहे. प्राचीन काळापासून गाव हे सामाजिक, आर्थिक आणि राजकीय जीवनाचे केंद्र राहिले आहे. गावपातळीवर लोकांनी एकत्र येऊन आपले प्रश्न सोडवण्याची परंपरा होती. ग्रामसभा ही केवळ एक बैठक नसून ती लोकशाहीची मूळ शाळा होती, जिथे संवाद, चर्चा आणि सहमतीच्या आधारे निर्णय घेतले जात. ही परंपरा पुढेही विविध स्वरूपांत टिकून राहिली. स्वातंत्र्यलढ्याच्या काळात महात्मा गांधी यांनी 'ग्रामस्वराज्य' या संकल्पनेला विशेष महत्त्व दिले. त्यांच्या मते, भारताचा खरा विकास हा गावांच्या स्वायत्ततेत आणि स्वावलंबनात आहे. प्रत्येक गाव हे एक स्वतंत्र प्रजासत्ताक असावे, जेथे लोक स्वतःच्या गरजांनुसार निर्णय घेतात आणि विकासाची दिशा ठरवतात, ही त्यांची भूमिका होती.

स्वातंत्र्यानंतर भारताने लोकशाही शासनपद्धती स्वीकारली, परंतु सुरुवातीच्या काळात स्थानिक स्वराज्य संस्थांना अपेक्षित ते बळ मिळाले नाही. ग्रामीण विकासासाठी विविध योजना राबवण्यात आल्या, मात्र त्या योजनांच्या अंमलबजावणीत स्थानिक लोकांचा सहभाग कमी असल्याने अपेक्षित परिणाम साध्य होत नव्हते. या पार्श्वभूमीवर १९५७ साली स्थापन झालेल्या बलवंतराव मेहता समितीने पंचायती राज व्यवस्थेची पुनर्रचना करण्याची शिफारस केली. या समितीने ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषद या त्रिस्तरीय रचनेची संकल्पना मांडली. या रचनेमुळे स्थानिक पातळीवर निर्णय घेण्याचे अधिकार लोकप्रतिनिधींना देण्यात आले आणि प्रशासन अधिक लोकाभिमुख बनले.पुढील काळात अशोक मेहता समिती, जी. व्ही. के. राव समिती आणि एल. एम. सिंगवी समिती यांनी पंचायती राज व्यवस्थेच्या बळकटीकरणासाठी महत्त्वपूर्ण सूचना केल्या. या सर्व प्रयत्नांचा परिपाक म्हणून १९९२ साली भारतीय संविधानात ७३वी घटनादुरुस्ती करण्यात आली आणि २४ एप्रिल १९९३ पासून ती अंमलात आली. याच ऐतिहासिक घटनेच्या स्मरणार्थ दरवर्षी २४ एप्रिल हा दिवस 'राष्ट्रीय पंचायती राज दिन' म्हणून साजरा केला जातो. या दुरुस्तीमुळे पंचायती राज संस्थांना संविधानिक दर्जा मिळाला आणि त्यांच्या अधिकार व जबाबदाऱ्यांची स्पष्ट मांडणी करण्यात आली.

७३व्या घटनादुरुस्तीचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे ग्रामसभेला दिलेले महत्त्व होय. ग्रामसभा ही स्थानिक लोकशाहीची मूलभूत यंत्रणा आहे. गावातील सर्व प्रौढ नागरिक हे ग्रामसभेचे सदस्य असतात आणि ते थेट निर्णय प्रक्रियेत सहभागी होऊ शकतात. यामुळे लोकशाही अधिक व्यापक आणि समावेशक बनते. ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषद या संस्थांना विविध विकासकामांसाठी अधिकार देण्यात आले. नियोजन, अंमलबजावणी आणि देखरेख या सर्व प्रक्रियांमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांचा सहभाग वाढवण्यात आला.

या व्यवस्थेचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे सामाजिक न्यायाची अंमलबजावणी. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि महिलांसाठी आरक्षणाची तरतूद करून समाजातील वंचित घटकांना सत्तेत सहभागी होण्याची संधी देण्यात आली. विशेषतः महिलांसाठी किमान एक तृतीयांश आरक्षणामुळे ग्रामीण भागात महिला नेतृत्वाची एक नवीन लाट निर्माण झाली आहे. आज अनेक महिला सरपंच, पंचायत सदस्य आणि जिल्हा परिषद अध्यक्ष म्हणून प्रभावीपणे काम करत आहेत. त्यांच्या नेतृत्वामुळे ग्रामीण विकासात संवेदनशीलता आणि समावेशकता वाढली आहे. पंचायती राज व्यवस्थेचा मुख्य उद्देश म्हणजे स्थानिक पातळीवर लोकांच्या सहभागातून विकास साध्य करणे हा आहे.



पाणीपुरवठा, स्वच्छता, आरोग्य, शिक्षण, शेती, रोजगारनिर्मिती यांसारख्या विविध क्षेत्रांत ग्रामपंचायती महत्त्वाची भूमिका बजावतात. सरकारच्या विविध योजना तळागाळापर्यंत पोहोचवण्याचे कार्य या संस्थांमार्फतच केले जाते. त्यामुळे पंचायती राज व्यवस्था ही ग्रामीण विकासाचा कणा म्हणून ओळखली जाते.

तथापि, या व्यवस्थेसमोर अनेक आव्हाने देखील आहेत. आर्थिक स्वायत्ततेचा अभाव, प्रशासकीय अडथळे, अधिकारांचे केंद्रीकरण आणि राजकीय हस्तक्षेप यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कार्यक्षमतेवर परिणाम होतो. काही ठिकाणी पारदर्शकतेचा अभाव आणि भ्रष्टाचाराच्या समस्या देखील आढळतात. ग्रामसभांमध्ये नागरिकांचा कमी सहभाग हा देखील एक गंभीर मुद्दा आहे. लोकशाही ही केवळ मतदानापुरती मर्यादित न राहता ती सततच्या सहभागातून सशक्त होते, ही जाणीव समाजात रुजवणे आवश्यक आहे.

या आव्हानांवर मात करण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांना अधिक आर्थिक स्वायत्तता देणे गरजेचे आहे. त्यांना करआकारणीचे अधिकार वाढवणे, निधीचे योग्य वितरण करणे आणि त्यांचा प्रभावी वापर सुनिश्चित करणे आवश्यक आहे. स्थानिक प्रतिनिधींना प्रशिक्षण देऊन त्यांची प्रशासनिक क्षमता वाढवणे आवश्यक आहे. ग्रामसभेचे महत्त्व वाढवून नागरिकांचा सक्रिय सहभाग सुनिश्चित करणे हीदेखील अत्यंत आवश्यक बाब आहे.

आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात डिजिटल साधनांचा वापर करून पंचायती राज व्यवस्थेला अधिक प्रभावी बनवता येते. ई-गव्हर्नन्सच्या माध्यमातून कामकाज अधिक पारदर्शक आणि जलद होते. नागरिकांना माहिती सहज उपलब्ध होते आणि सेवा सुलभपणे मिळतात. सामाजिक लेखापरीक्षण, माहितीचा अधिकार आणि जनसहभागाच्या विविध माध्यमांद्वारे उत्तरदायित्व वाढवता येते.

राष्ट्रीय पंचायती राज दिन हा केवळ एक स्मरणदिन नसून तो स्थानिक लोकशाहीच्या बळकटीकरणाचा उत्सव आहे. या दिवशी देशभरात विविध कार्यक्रम आयोजित केले जातात, उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या ग्राम पंचायतींचा सन्मान केला जातो आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कार्याचा आढावा घेतला जातो. यामुळे इतर संस्थांना प्रेरणा मिळते आणि विकासाची नवी दिशा मिळते.

आज भारत वेगाने प्रगती करत असताना ग्रामीण भागाचा विकास हा अत्यंत महत्त्वाचा मुद्दा ठरतो. शाश्वत विकास साध्य करण्यासाठी स्थानिक पातळीवर नियोजन आणि अंमलबजावणी आवश्यक आहे. पंचायती राज संस्था या प्रक्रियेत केंद्रस्थानी आहेत. त्या केवळ विकासाच्या यंत्रणा नसून लोकशाहीच्या जडणघडणीचा पाया आहेत.

शेवटी, राष्ट्रीय पंचायती राज दिनाच्या निमित्ताने आपण सर्वांनी स्थानिक स्वराज्य संस्थांचे महत्त्व ओळखून त्यांना बळकट करण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. प्रत्येक नागरिकाने ग्रामसभेत सहभागी होऊन निर्णय प्रक्रियेत भाग घेतला पाहिजे. स्थानिक प्रश्नांवर चर्चा करून त्यांचे समाधान शोधले पाहिजे. लोकशाही ही केवळ शासनाची जबाबदारी नसून ती प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे. पंचायती राज व्यवस्था ही भारतीय लोकशाहीची खरी ओळख आहे आणि तिच्या सशक्तीकरणातूनच देशाचा समतोल, शाश्वत आणि सर्वसमावेशक विकास साध्य होऊ शकतो.

## वरदहस्त

भोंदु गिरी वृध्दींगत
बड्यांचा वरद हस्त
वेळी हवा हस्तक्षेप
धक्का दे जबरदस्त

अंधश्रद्धा बोकाळी
उन्मत्त अस्ताव्यस्त
यश मिळवं एनकेन
अपयशाने भयग्रस्त

बाबांचा आश्रमसजे
पोलिसचं घाले गस्त
झाकेडोळेआतचाळे
बिभत्सता मद मस्त

फुकटात लाट जागा
बनवे संस्था विश्वस्त
शंका नाही उपस्थित
काळेधंदे ते आश्वस्थ

माहितीचा अधिकार
इथेचं पहुंडला सुस्त
विरोधात एखादउभे
तात्काळ हो उध्वस्त

सुटूनजाई सहजगति
गुन्हेगार रे अभिशस्त
कसा बसेलं अटकाव
गळून पडते इथेशिस्त

**- हेमंत मुसरीफ, पुणे.**
**९७३०३०६९९६**

# कामोठे येथे नर्सरी आणि विक्रेत्यांवर तोडक कारवाई



**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.२३, पनवेल :** कामोठे प्रभाग समिती 'क' मार्फत अनधिकृत अतिक्रमण व फेरीवाले यांच्यावर मंगळवारी आणि बुधवारी व्यापक स्वरूपात धडक कारवाई करण्यात आली. आयुक्त मंगेश चितळे यांच्या सूचनेनूसार करण्यात आलेल्या या कारवाईत विविध ठिकाणांवरील अनधिकृत स्टॉल, नर्सरी, फेरीवाले व हातगाड्यांवर कारवाई करून साहित्य जप्त करण्यात आले तसेच काही ठिकाणी झोपड्या हटविण्यात आल्या.

महापालिका कार्यक्षेत्रातील चारही प्रभागांमध्ये अतिक्रमणाविरोधात कारवाई करण्याच्या सूचना उपायुक्त नानासाहेब कामठे यांनी दिल्या असून त्यानूसार कामोठे सेक्टर १९ मधील मारुती स्वीट व चेतक स्वीट परिसरातील अनधिकृत स्टॉलवर कारवाई करून सिलेंडर, शेगडी व इतर साहित्य जप्त करण्यात आले. तसेच सेक्टर ७ येथील एमएनआर स्कूल चौकात अनधिकृत फळ विक्रेत्यांवर कारवाई करण्यात आली. कामोठे पोलीस स्टेशन समोर फेरीवाल्यांवरही कारवाई करून त्यांचे साहित्य जप्त करण्यात आले.

याचबरोबर सहाय्यक आयुक्त तथा प्रभाग अधिकारी डॉ. रूपाली माने व प्रभाग अधीक्षक दशरथ भंडारी यांच्या मार्गदर्शनाखाली बुधवारी सेक्टर १९, २५, अक्षर बिल्डिंग परिसर, खान्देश्वर स्टेशन, सेक्टर २१ व सेक्टर ३४ येथे अनधिकृत व विनापरवाना नर्सरींवर कारवाई करून संबंधित झोपड्या तोडण्यात आल्या.

तसेच खान्देश्वर स्टेशन परिसरात अनधिकृत विक्रेत्यांवर कारवाई करून त्यांचे साहित्य जप्त करण्यात आले.

सेक्टर २१ येथे दोन नर्सरींसह भंगार व सायकल विक्रेत्यांच्या झोपड्यांवर कारवाई करण्यात आली. सेक्टर ३४ येथे अनधिकृत हातगाडी हटविण्यात आली. तसेच नीलकंठ स्वीट परिसरात अनधिकृत नारळ विक्रेत्यावर कारवाई करण्यात आली.

अनधिकृत व्यवसाय करणाऱ्यांवरती महापालिकेने तोडक कारवाईचा बडगा उचलला असून यापुढेही अनधिकृत व्यवसायधारकांवर अशाच प्रकारची कारवाई पुढेही सुरू राहील, असे महापालिकेतर्फे सूचित करण्यात आले आहे.

**प्रभाग समिती ड अंतर्गत नविन पनवेलमध्ये अतिक्रमण कारवाई**

- प्रभाग समिती 'ड' मार्फत दिनांक २१ एप्रिल २०२६ रोजी नविन पनवेल परिसरात अतिक्रमणविरोधी कारवाई करण्यात आली.
- या कारवाईत सेक्टर ३ येथील अनधिकृत भाजी व फळ विक्रेत्यांकडून माल जप्त करण्यात आला. तसेच सेक्टर २ व शिवा कॉम्प्लेक्स परिसरातील अनधिकृतरित्या विक्री करणाऱ्या चिकन विक्रेत्यांचे साहित्यही जप्त करण्यात आले.
- याशिवाय ब्रिजवासी बिकानेर स्वीट येथील सिलेंडर व काउंटर जप्त करून फुटपाथवरील अनधिकृत फळ विक्रेत्यांवरही कारवाई करण्यात आली. विचुंबे रोड येथे बसलेल्या फुटपाथवरील भाजी विक्रेत्यांवर कारवाई करून जप्त केलेले कांदे व बटाटे गोडाऊनमध्ये जमा करण्यात आले आहेत.
- सहायक आयुक्त तथा प्रभाग अधिकारी रूपाली माने यांच्या उपस्थितीत अतिक्रमण पथकाच्या मार्फतही कारवाई करण्यात आली.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## पेण आरटीओ कार्यालयाला डिवायडर भेट; वाहतूक शिस्तीला मिळणार चालना



**अक्षराज : मितेश जाधव**

**दि.२३, पेण (रायगड) :** डॉ. श्री.नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान यांच्या वतीने पेण येथील आरटीओ कार्यालयाला डिवायडर भेट स्वरूपात देण्यात आले असून, या उपक्रमामुळे कार्यालय परिसरातील वाहतूक अधिक शिस्तबद्ध व सुरक्षित होण्यास मोठी मदत होणार आहे. पेण आरटीओ कार्यालय परिसरात दररोज वाहनांची मोठ्या प्रमाणात वर्दळ असते. वाहन तपासणी, नोंदणी व इतर कामांसाठी येणाऱ्या नागरिकांमुळे अनेकदा वाहतुकीची कोंडी निर्माण होत होती. यावर उपाय म्हणून प्रतिष्ठानने पुढाकार घेत डिवायडर उपलब्ध करून दिले. या डिवायडरमुळे वाहनांची ये-जा सुलभ होऊन अपघातांचा धोका कमी होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. या उपक्रमामुळे आरटीओ कार्यालय परिसरात वाहतुकीचे योग्य नियोजन साध्य होणार असून, नागरिकांनाही अधिक सुरक्षित आणि सुसूत्र सेवा मिळणार आहे. स्थानिक नागरिक तसेच वाहनधारकांनी या उपक्रमाचे स्वागत करत प्रतिष्ठानच्या सामाजिक बांधिलकीचे कौतुक केले आहे. याप्रसंगी उप प्रादेशिक परिवहन अधिकारी माधव सुर्यवंशी, सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी विष्णू घोडे, सहायक मोटार वाहन निरीक्षक अमोल शेलार, संदेश मोरे, मंगेश चौधरी, अमर शेटे, कार्यालय अधीक्षक मंगेश नाईक तसेच प्रतिष्ठानचे पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांनी सांगितले की, अशा प्रकारचे उपक्रम समाजात सकारात्मक बदल घडवून आणतात. सार्वजनिक ठिकाणी शिस्तबद्ध वाहतूक व्यवस्था निर्माण करणे ही काळाची गरज असून, प्रतिष्ठानच्या या उपक्रमामुळे इतर संस्थांनाही प्रेरणा मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

## परभणीत पोलिसांना बळ : 'सद् रक्षणगड' उद्घाटनासह ३१ वाहनांचे लोकार्पण



**अक्षराज : रहीम कोक्कर**

**दि.२३, परभणी :** जिल्ह्यातील पोलिस यंत्रणा अधिक सक्षम, गतिमान आणि परिणामकारक करण्याच्या दृष्टीने आज महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले. परभणी पोलीस मुख्यालयात उभारण्यात आलेल्या 'सद् रक्षणगड' किल्ल्याचे भव्य उद्घाटन करण्यात आले, तसेच जिल्हा वार्षिक योजनेतून पोलिस विभागाला देण्यात आलेल्या ३१ नवीन वाहनांचे लोकार्पणही यावेळी करण्यात आले.या उपक्रमामुळे जिल्ह्यातील गस्त व्यवस्था अधिक बळकट होणार असून, पोलिसांचा प्रतिसाद वेळ कमी होण्यास मदत होईल. परिणामी, कायदा-सुव्यवस्था राखण्याची क्षमता अधिक प्रभावी होणार असल्याचे मानले जात आहे.राज्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली पोलिस यंत्रणा आधुनिक करण्यावर विशेष भर दिला जात आहे. पोलिस ठाणे व वसाहतींचे उन्नतीकरण, अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करून देणे आणि शहरांमध्ये सीसीटीव्ही यंत्रणा उभारण्याच्या दृष्टीने राज्य शासन सकारात्मक पावले उचलत आहे. या कार्यक्रमाला परभणी जिल्ह्याचे पालकमंत्री मेघना बोर्डीकर जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा लता वाकळे, महापौर सय्यद इकबाल सय्यद खाजा, जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण, पोलीस अधीक्षकरवींद्रसिंह परदेशी, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नतीशा माथुर, मनपा आयुक्त नितीन नार्वेकर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. या उपक्रमामुळे परभणी जिल्ह्यातील नागरिकांना अधिक सुरक्षित आणि तत्पर पोलिस सेवा मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

## वेसवी नांदगाव अंगणवाडीत राष्ट्रीय पोषण पखवडा साजरा



**अक्षराज : उमेश तबिब**

**दि.२३, दापोली (रत्नागिरी) :** एकात्मिक बाल विकास सेवा योजना अंतर्गत बिट उमरोली अंगणवाडी कें.वेसवी नांदगाव या ठिकाणी प्रकल्प अधिकारीसुनिलखरात व उमरोली बिट पर्यवेक्षिका ज्ञानेश्वरी दातिर यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय पोषण पखवडा साजरा करण्यात आला. राष्ट्रीय पोषण पखवडा ही भारत सरकारच्या महीला आणि बाल विकास मंत्रालयाद्वारे राबविली जाणारी एक महत्वाची मोहीम आहे. कुपोषणमुक्त भारत घडविण्यासाठी जन आंदोलनाच्या माध्यमातून लोकांमध्ये आहार विषयी जनजागृती निर्माण करणे हा मुख्य उद्देश आहे.

अंगणवाडी कें.वेसवी नांदगाव हया ठिकाणी ०९ एप्रिल ते २३ एप्रिल २०२६हया कालावधित राबवण्यात आला. ० ते ६ वर्षात बालकांच्या मेंदूचा जास्तीतजास्त विकास होतो. या अनुशंगाने विविध प्रकारचे कार्यक्रम घेण्यात आले. गावात पोषण फेरी काढून जनजागृती, पौष्टिक पाककृती प्रदर्शन सकस आहाराचे महत्व, स्वस्थ बालक स्पर्धा, गरोदर व स्तनदा मातेला मार्गदर्शन, ऍनिमिया जार्गृतता, बालकांचा लठ्ठपणा, सामुदाय आधारीत कार्यक्रम, बालविवाह प्रतिबंध प्रतिज्ञा, लशिकरण, जॅकफ ुडचे दुष्परिणाम, बालकांना टीव्ही, मोबाईलचे दुष्परीणाम मैदानी खेळाचे महत्व पालकांसोबत मैदानी खेळ लगोरी, लंगडी, फुगडी, आंधळी कोशिंबिर, आटयापाटया, आईचा रुमाल हरवला, तोच मझला सापडला, अनेक उपक्रम घेण्यात आले.आहार, आरोग्य व स्वच्छता अशा अनेक विषयी माहिती अंगणवाडी सेविका शलाका पवार यांनी दिली. या कार्यक्रमासाठी सरपंच प्रविणाखाडे, पुजा खाडे, उज्वल महीला मंडळ अध्यक्ष रजनी कालपे, वरीष्ठ माता सुलोचना खाडे आई तसेच सन्मानिय महिला मंडळ, माता पालक, जि.प.मुख्याध्यापिका नांदगाव सुनंदा जाधव, सन्मानिय ग्रामस्थ मंडळ यांचे मोलाचे सहकार्य लाभले. अंगणवाडी मदतनीस कु.नम्रता शिगवण यांचे ही मोलाचे योगदान लाभले. अंगणवाडी सेविका शलाका पवार यांनी सर्वांचे आभार मानले.

## जिंतूर तहसील कार्यालयात संपाचा परिणाम; नागरिकांची गैरसोय वाढली

**अक्षराज : रहीम कोक्कर**

**दि.२३, जिंतूर (परभणी) :** तहसील कार्यालयातील सरकारी कर्मचाऱ्यांनी सुरू केलेल्या संपामुळे नागरिकांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत आहे. विविध शासकीय कामांसाठी दररोज कार्यालयात येणाऱ्या नागरिकांना रिकाम्या हाताने परत जावे लागत असून संताप व्यक्त केला जात आहे. उत्पन्न दाखले, रहिवासी प्रमाणपत्र, जमीन नोंदी, तसेच इतर महसूल संबंधित कामे पूर्णपणे ठप्प झाली आहेत. विशेषतः शेतकरी व सर्वसामान्य नागरिकांना या परिस्थितीचा मोठा फटका बसत आहे. अनेकांची अत्यावश्यक कामे प्रलंबित राहिली असून वेळ आणि पैशांचा अपव्यय होत आहे. दरम्यान, कर्मचाऱ्यांनी आपल्या विविध मागण्यांसाठी हा संप पुकारला असून तो सुरूच राहण्याची शक्यता आहे. सरकार आणि संबंधित अधिकाऱ्यांनी लवकरात लवकर तोडगा काढावा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. तहसील प्रशासनानेही परिस्थितीची दखल घेऊन नागरिकांना होणारी गैरसोय कमी करण्यासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## देसाई-पडले-खिडकाळीची पाणी समस्या सुटणार; ५०० एमएम नव्या जलवाहिनीचे उद्घाटन



**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.२३, देसाई गांव (ठाणे) :** देसाई, पडले आणि खिडकाळी परिसरातील नागरिकांना आज दिलासा मिळाला. अनेक वर्षांपासून भेडसावत असलेल्या पाणी टंचाईवर अखेर कायमस्वरूपी तोडगा निघाला आहे. ठाणे महानगरपालिकेमार्फत देसाई नाका येथील क्रोमा शोरूमसमोर ५०० एमएम व्यासाच्या नव्या जलवाहिनीचे आज, बुधवार दिनांक २२ एप्रिल २०२६ रोजी उद्घाटन करण्यात आले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली, तसेच आमदार राजेश मोरे व शिवसेना शहरप्रमुख रमाकांत मढवी यांच्या सहकार्याने नगरसेवक बाबाजी बाळाराम पाटील यांनी या कामासाठी सातत्याने पाठपुरावा केला होता.

**जुनी लाईन बदलून नव्याने टाकली :** देसाई, पडले, खिडकाळी या भागात जुनी व कमी व्यासाची जलवाहिनी असल्याने नागरिकांना गेल्या अनेक वर्षांपासून कमी दाबाने व अनियमित पाणीपुरवठ्याचा सामना करावा लागत होता. नागरिकांच्या मागणीनुसार आज जुनी लाईन पूर्णपणे काढून टाकून त्या ठिकाणी ५०० एमएम व्यासाची नवीन जलवाहिनी कार्यान्वित करण्यात आली आहे. या कामामुळे परिसरातील हजारो कुटुंबांची पाण्याची अडचण लवकरच दूर होईल, असा विश्वास नगरसेवक बाबाजी पाटील यांनी व्यक्त केला.

**उद्घाटनाला मान्यवरांची उपस्थिती**

आज झालेल्या या उद्घाटनप्रसंगी स्थानिक नगरसेवक बाबाजी पाटील, नगरसेविका वेदिका पाटील, नगरसेविका अर्चना पाटील, महापालिकेचे अधिकारी वाघिरे, शिवसेना विभागप्रमुख विष्णू कोटकर, उपविभाग प्रमुख दिपेश पाटील, भारतीय जनता पार्टी ज्येष्ठ पदाधिकारी, बाळाराम पाटील,जिल्हाध्यक्ष भाजपा अभियंता प्रक्रोष्ट ठाणे साहिल पाटील, यांच्यासह मधुकर पाटील विनायक पाटील, राकेश पाटील व मोठ्या संख्येने शिवसैनिक, पदाधिकारी व स्थानिक नागरिक उपस्थित होते.

देसाई-पडले परिसरातील माझ्या सर्व बांधवांसाठी ही आनंदाची बातमी आहे. उपमुख्यमंत्री शिंदे साहेब व खासदार साहेबांच्या मार्गदर्शनामुळे हे काम वेळेत पूर्ण झाले. आपल्या सर्वांच्या सहकार्याने अशा विकासकामांना नेहमीच गती देत राहू, असे नगरसेवक बाबाजी पाटील यावेळी म्हणाले.

## चंद्रपूरात धान पिकावर 'मंड्या' तणाचे मोठे संकट; शेतकरी आर्थिक अडचणीत

**नागभीड, चिमूर तालुक्यासह विदर्भात वाढता प्रादुर्भाव**

**ओळख न पटल्याने नियंत्रण कठीण, कृषी विभागाकडून उपाययोजनांची मागणी**



**अक्षराज : नितीन पाटील**

**दि.२३, चिमूर (चंद्रपूर) :** विदर्भातील प्रमुख धान उत्पादक जिल्हा असलेल्या चंद्रपूरमध्ये सध्या 'मंड्या' नावाच्या नव्या तणाने धान पिकावर मोठे संकट निर्माण केले आहे. नागभीड तालुक्यातील चिंधीचकसह अनेक भागांत या तणाचा झपाट्याने प्रादुर्भाव वाढत असून, धानासारखेच दिसणारे हे तण शेतकऱ्यांसाठी डोकेदुखी ठरत आहे. यामुळे उत्पादनात मोठी घट येण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

विदर्भातील चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया आणि नागपूर हे जिल्हे धान उत्पादनासाठी ओळखले जातात. त्यापैकी चंद्रपूर जिल्ह्यात धान हे मुख्य पीक असून, विविध प्रजातींची मोठ्या प्रमाणात लागवड केली जाते. येथील तांदळाला देशाबरोबरच परदेशातही मागणी असल्यामुळे शेतकरी मोठ्या प्रमाणात धान लागवड करतात.

मात्र, यंदाच्या खरीप आणि उन्हाळी हंगामात 'मंड्या' नावाच्या तणाने शेतकऱ्यांसमोर नवे संकट उभे केले आहे. विशेषतः नागभीड तालुक्यातील चिंधीचक सह अनेक गावांमध्ये या तणाचा मोठ्या प्रमाणात प्रादुर्भाव दिसून येत आहे. सुरुवातीच्या अवस्थेत हे तण धान पिकासारखेच दिसत असल्यामुळे शेतकऱ्यांना ते ओळखणे कठीण जाते.

वाढीच्या पुढील टप्प्यात मात्र हे तण धानापेक्षा उंच वाढते आणि त्याचा बुंधा मजबूत असल्यामुळे धानाच्या वाढीवर परिणाम होतो. परिणामी, धान पिकाचे उत्पादन मोठ्या प्रमाणात घटते. या तणाला येणारे लहान दाणे परिपक्व झाल्यानंतर पुन्हा शेतात पडतात आणि त्याचा प्रसार झपाट्याने वाढतो.

शेतकरी सध्या पारंपरिक निंदन पद्धतीने या तणावर नियंत्रण मिळवण्याचा प्रयत्न करत आहेत. मात्र, धान आणि तण यामधील फरक ओळखणे कठीण असल्यामुळे निंदन प्रभावी ठरत नाही. शिवाय, मोठ्या प्रमाणात तण वाढल्यामुळे मजुरीचा खर्चही वाढत आहे.

विशेष म्हणजे, खत व कीडनाशकांचा वापर केल्यानंतर हे तण अधिक जोमाने वाढत असल्याचे शेतकऱ्यांचे निरीक्षण आहे. त्यामुळे समस्या अधिकच गंभीर बनत आहे.

यापूर्वी गाजर गवत आणि अमरवेल यांसारख्या तणांनी शेतीला मोठा फटका दिला होता. त्यावर नियंत्रणासाठी कृषी विभागाने प्रयत्न केले असले तरी पूर्ण निर्मूलन अद्याप झालेले नाही. सध्याचे 'मंड्या' तण हे त्यापेक्षाही अधिक धोकादायक असल्याचे शेतकरी सांगत आहेत.

या तणाचा उगम नेमका कुठून झाला बियाण्यातून, औषधांमधून की इतर कोणत्या मार्गानेयाबाबत अजूनही स्पष्टता नाही. मात्र, मागील वर्षी कमी प्रमाणात दिसणारे हे तण यंदा मोठ्या प्रमाणात वाढले असून आता ते विदर्भातील इतर जिल्ह्यांमध्येही पसरत असल्याची माहिती समोर येत आहे.

जर वेळेत या तणावर नियंत्रण मिळवले नाही, तर भविष्यात धान उत्पादनावर मोठा परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. त्यामुळे शेतकरी शासन आणि कृषी विभागाकडून तातडीने मार्गदर्शन आणि प्रभावी उपाययोजनांची मागणी करत आहेत. 'मंड्या' तणाच्या नियंत्रणासाठी विशेष मोहिम राबविणे गरजेचे असल्याचे मत व्यक्त होत आहे. योग्य तांत्रिक मार्गदर्शन, औषधांची उपलब्धता आणि व्यवस्थापनाच्या पद्धतींची माहिती दिल्यास या संकटावर मात करता येईल, अशी अपेक्षा शेतकरी व्यक्त करत आहेत.

## अखिल भारतीय अंतर विद्यापीठ स्पर्धेसाठी कोटा (राजस्थान) येथे संघ रवाना



**अक्षराज : साहेबराव परबत**

**दि.२३, सोलापूर :** राजस्थान राज्यातील कोटा येथे दिनांक २५ व २६ एप्रिल रोजी होणाऱ्या अखिल भारतीय अंतर विद्यापीठ गतका स्पर्धेसाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या गतका पुरुष संघाचे प्रस्थान झाले आहे. स्पर्धेपूर्वी विद्यापीठाच्या वतीने आयोजित करण्यात आलेले सराव शिबिर यशस्वीरीत्या संपन्न झाले.

सदर विद्यापीठाच्या गतका संघामध्ये रमेश धोडमणी, आर्यन चव्हाण, रोहित तेलंग, बसवराज शेंडगे (सर्व छत्रपती शिवाजी नाईट कॉलेज, सोलापूर), सुमित बनसोडे (कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर), तसेच शंकर धोत्रे आणि गुरुप्रसाद स्वामी (देशभक्त संभाजीराव गरड महाविद्यालय, मोहोळ) या खेळाडूंचा समावेश आहे. या संघास छत्रपती शिवाजी नाईट कॉलेजचे प्रा.संतोष गवळी यांचे मार्गदर्शन लाभले असून संघ व्यवस्थापक म्हणून प्रा. विशाल गाडेकर हे जबाबदारी सांभाळत आहेत.

संघाच्या या यशस्वी वाटचालीसाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.प्रकाश महानवर, प्रभारी कुलसचिव तथा क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागाचे संचालक डॉ.अतुल लकडे, मराठा समाज सेवा मंडळाचे अध्यक्ष व विद्यापीठाचे माजी सिनेट सदस्य मनोहर पंत सपाटे, प्राचार्य डॉ.नितीन मोटे तसेच प्रा.अमोल वाघमोडे यांनी खेळाडूंचे अभिनंदन करून आगामी स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. विद्यापीठाचा हा गतका संघ स्पर्धेत उत्तम कामगिरी करेल, असा विश्वास उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केला.

## परिवहन मंत्री यांचे स्पष्ट निर्देश: रिक्षा-टॅक्सी चालकांना मराठी अनिवार्य



**अक्षराज : घनश्याम आंबोकर**

**दि.२३, मिरा भाईंदर :** राज्याचे परिवहन मंत्री यांनी महाराष्ट्रात रिक्षा-टॅक्सी चालकांना मराठी बोलता येणे अनिवार्य असल्याचे पुन्हा एकदा स्पष्ट केले आहे. तरीही वकील गुणरत्न सदावर्ते अमराठी रिक्षा चालकांच्या समर्थनार्थ मिरा-भाईंदरमध्ये मैदानात उतरले आहेत. त्याकरिता बीजेपी आमदार नरेंद्र मेहतांना भेटले.

**नेमकं प्रकरण काय?**

मिरा-भाईंदर शहरात गेल्या काही दिवसांपासून रिक्षा चालकांनी प्रवाशांशी मराठीतून संवाद साधावा, अशी मागणी स्थानिक संघटनांनी लावून धरली आहे. याच पार्श्वभूमीवर परिवहन मंत्री यांनी प्रतिक्रिया देताना सांगितले, महाराष्ट्र मोटार वाहन नियमांनुसार सार्वजनिक प्रवासी वाहतूक परवाना मिळवण्यासाठी स्थानिक भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे. प्रवाशांच्या सुरक्षेसाठी आणि सोयीसाठी हा नियम आहे. तो पाळावाच लागेल.

**सदावर्ते यांचा विरोध का?**

परिवहन मंत्री यांनी नियम स्पष्ट केल्यानंतरही ॲड. गुणरत्न सदावर्ते यांनी मिरा-भाईंदरमध्ये अमराठी रिक्षा चालकांची बैठक घेतली. आमचा मराठी भाषेला विरोध नाही. पण मराठी येत नाही या कारणावरून कोणाचाही रोजगार हिरावून घेता येणार नाही. घटनेने दिलेल्या व्यवसाय स्वातंत्र्याच्या अधिकारावर गदा येते, अशी भूमिका सदावर्ते यांनी मांडली.

सदावर्ते यांच्या मते, सरकारने आधी चालकांना मराठी शिकण्यासाठी मोफत वर्ग सुरू करावेत. ६ महिने ते १ वर्षाची मुदत द्यावी. थेट परवाना नाकारणे किंवा रद्द करणे हे घटनाबाह्य आहे. आम्ही चालकांना कायदेशीर मदत देऊ.

**स्थानिक संघटनांची प्रतिक्रिया**

मराठी संघटनांनी सदावर्ते यांच्या भूमिकेवर नाराजी व्यक्त केली आहे. महाराष्ट्रात राहायचे, व्यवसाय करायचा, पण मराठी शिकायची नाही हे कसे चालेल? कर्नाटक, गुजरातमध्ये त्यांच्या भाषेची सक्ती असते, मग महाराष्ट्रात का नको? असा सवाल संघटनांनी उपस्थित केला आहे.

# रस्त्याच्या कामाने घेतला वॉचमनचा बळी

## जेसीबी च्या धडकेत एक ठार, एक जखमी; चालकाविरुद्ध कासा पोलिसांत गुन्हा

**अक्षराज : निलेश कासट**

**दि.२३, डहाणू (पालघर) :** डहाणू तालुक्यातील कासा – सायवन मार्गाचे रस्ता रुंदीकरणाचे काम सुरु आहे. या राज्यमार्गावर मोठ्या प्रमाणात वाहनाची वर्दळ सुरु असते. मात्र नवीन रस्ता काँक्रिटीकरण व रस्ता रुंदीकरण सुरु असल्याने रस्ता जागोजागी खोदला आहे. मात्र रस्त्याचे काम सुरु असताना सूचना फलक, डिव्हायडर आदी चा अभाव असल्याने अपघात घडत आहे. हा राज्यमार्ग आदिवासी गावातून जात असल्याने या मध्ये अनेक मालकी झाडे, जमीन जात असल्याने बाधित शेतकऱ्यांना मोबदला न देता कंपनी चा मनमानी कारभार असल्याचा आरोप भाजपा राज्य परिषदेचे सदस्य सुरेश पाडवी यांनी केला आहे.

कंपनी मनमानीपणामुळे एका स्थानिक आदिवासी चा बळी गेला आहे. कंपनी चे रात्री च्या वेळी काम सुरु असताना भुजाडी गावातील मोठामाळ येथे झालेल्या भीषण अपघातात एका वॉचमनचा मृत्यू झाला असून दुसरा गंभीर जखमी झाला आहे. या प्रकरणी जेसीबी चालकाविरुद्ध कासा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, लहु हरी हाडळ (वय ५८, रा. धरमपूर पारसपाडा, डहाणू यांचा या अपघातात मृत्यू झाला. तर फिर्यादी प्रदेश काशिनाथ कासट (वय ४०) हे जखमी झाले आहेत. दोघेही भुजाडी गावातील मोठामाळ येथे एसआरएम कंपनीच्या सुरू असलेल्या रस्ते बांधकाम ठिकाणी वॉचमन म्हणून काम करत होते. दि.२१ एप्रिल रोजी रात्री सुमारे ११.३० वाजण्याच्या सुमारास, धरमपूर बाजूकडून सायवनकडे जाणाऱ्या रस्त्यावरून येणारी एमएच १२ वायडी ४२२३ क्रमांकाची जेसीबी आरोपी चालक शाकीब मोहम्मद अश्फ नाईक (वय २३) याने भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवत दोघांना जोरदार धडक दिली.

या अपघातात लहु हरी हाडळ यांच्या डोक्यावरून जेसीबी गेल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. तर फिर्यादी प्रदेश कासट यांना फरफटत नेल्याने त्यांच्या कानाला व हाताला गंभीर दुखापत झाली आहे. अपघातानंतर चालकाने कोणतीही मदत न करता व पोलिसांना माहिती न देता जेसीबी घटनास्थळीच सोडून पळ काढल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. यामुळे स्थानिक नागरिकां मध्ये रोष व्यक्त करत असून अखिल सरपंच परिषदेचे अध्यक्ष सुरेश शिंदा हे पालघर पोलीस व जिल्हाधिकारी यांच्या तक्रार करणार असल्याचे सांगितले. या प्रकरणी कासा पोलीस ठाण्यात गुन्हा रजि. नं. ७२/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम १०६(१), २८१, १२५(अ), १२५(ब) तसेच मोटार वाहन कायदा कलम १८४ व १३४ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेचा पुढील तपास कासा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अमर पाटील यांच्या मार्गदर्शना खाली पो.उपनिरीक्षक उदय पाठक करीत आहेत.

## मुंब्रा–दिवा परिसरात खारफुटी नष्ट करून भराव; ६६ एकर बाधित, अज्ञातांविरोधात गुन्हा

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.२२, दिवा (ठाणे) :** मुंब्रा–दिवा परिसरात खाडी किनारी खारफुटी नष्ट करून मोठ्या प्रमाणावर भराव टाकल्याचे प्रकरण उघडकीस आले आहे. याप्रकरणी मुंब्रा पोलीस ठाण्यात अज्ञातांविरोधात पर्यावरण (संरक्षण) अधिनियम १९८६ च्या कलम १५ व १७ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



ठाणे जिल्ह्यातील या भागात भूमाफियांकडून खारफुटी क्षेत्रांवर अतिक्रमण करून भराव टाकण्याचे प्रकार वारंवार समोर येत आहेत. स्वस्त दरात घरे विक्रीसाठी अशा जमिनींचा वापर केल्याच्या तक्रारीही आहेत. सध्या रेल्वे रुळांलगतही भराव टाकला जात असल्याने पर्यावरणाबरोबरच रेल्वे सुरक्षेबाबतही चिंता व्यक्त केली जात आहे.

**पूराचा धोका वाढणार :**

पर्यावरण तज्ज्ञांच्या मते, खारफुटी नष्ट झाल्यामुळे पावसाळ्यात पूरस्थिती तीव्र होण्याचा धोका वाढतो. गेल्या वर्षी मुसळधार पावसात मुंब्रा आणि दिवा परिसरात अनेक घरांमध्ये पाणी शिरल्याच्या घटना घडल्या होत्या. पर्यावरण क्षेत्रात कार्यरत संस्थांच्या दाव्यानुसार सुमारे ६६ एकर खारफुटी क्षेत्र बाधित झाले आहे.

**कठोर कारवाईची मागणी :**

महसूल अधिकाऱ्यांनी तक्रार दाखल केल्यानंतर गुन्हा नोंदवण्यात आला आहे. मात्र केवळ कागदोपत्री कारवाई न करता भराव काढून जागा मूळ स्थितीत आणावी आणि दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी पर्यावरणप्रेमींनी केली आहे.

## मनपा क्षेत्रातील पट्टे वाटप संदर्भात जिल्हाधिकाऱ्यांकडून आढावा

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२३, चंद्रपूर :** महानगरपालिका क्षेत्रात ०१ जानेवारी २०११ पुर्वीची अतिक्रमणे नियमानुकूल करण्याबाबत राज्य शासनाने २३ मार्च २०२६ रोजी शासन निर्णय निर्गमित केला आहे. या अनुषंगाने चंद्रपूर महानगर पालिका क्षेत्रातील पात्र लाभार्थ्यांना जागेचा मालकी पट्टा देण्यासंदर्भात जिल्हाधिकारी वसुमना पंत यांनी (दि. २२) रोजी आढावा घेतला.

जिल्हाधिकारी कार्यालयात पार पडलेल्या या बैठकीला मनपा आयुक्त अकुनुरी नरेश, निवासी उपजिल्हाधिकारी दगडू कुंभार, उपजिल्हाधिकारी( जमीन) सचिन कुमावत, जिल्हा अधिक्षक भुमी अभिलेख प्रदिप जगताप, उपअधिक्षक गिज्जेवार, मनपाचे उपायुक्त संदिप चिद्रावार, शुभांगी सूर्यवंशी व इतर अधिकारी उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकारी पंत म्हणाल्या कि महानगरपालिका क्षेत्रात १ जानेवारी २०११ पुर्वीचे अतिक्रमण असलेल्या पात्र लाभार्थ्यांना मालकी हक्क पट्टे देण्याचा कार्यक्रम मिशन मोडवर राबवावा, यासाठी २३ मार्च २०२६ च्या शासन निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी करावी.




जास्तीत जास्त पात्र लाभार्थ्यांना पट्टे द्यायचे आहे, ही सकारात्मकता ठेवून मनपाने नियोजन करावे. नागरिकांना याबाबत अवगत करण्यासाठी वार्डामध्ये विशेष शिबिरांचे आयोजन करावे. यासाठी नगरसेवकांची मदत घ्यावी. तसेच शहरी भागात होणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियानात हा विषय प्राधान्याने घ्यावा.

जेणेकरुन पात्र लाभार्थ्यांना पट्ट्यांचे वाटप करण्यात येईल, अशा सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी केल्या. ज्या लाभार्थ्यांकडे घर टॅक्स पावती किंवा वीज बील किंवा राशनकार्ड यापैकी कोणताही एक पुरावा असल्यास त्यांनी अर्जासोबत महानगरपालिकेच्या झोन कार्यालयात सादर करावा, असे उपायुक्त संदीप चिद्रावार यांनी सांगितले.

## सेनापती बापट पतसंस्थेच्या संचालकांविरोधात पारनेरमध्ये संतापाचा उद्रेक

### माजी आमदार विजय औटींच्या घरासमोर जोरदार घोषणाबाजी

**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.२३, सुपा (अहिल्यानगर) :** आपल्या आयुष्याची पुंजी आणि घामाचा पैसा सेनापती बापट मल्टिस्टेट को-ऑपरेटिव्ह सोसायटीमध्ये अडकल्याने संतप्त झालेल्या शेकडो ठेवीदारांनी पारनेर शहरात आक्रमक पवित्रा घेतला. गुरुवार, २३ एप्रिल रोजी सकाळी १० वाजेपासूनच तालुक्यातील विविध भागांतून ५०० ते ८०० ठेवीदार पारनेरच्या बाजार तळावर एकत्र जमले होते. या ठिकाणी सर्वांनी एकत्रित येत संस्थेचे संस्थापक व माजी आमदार विजयराव औटी यांच्या विरोधात एल्गार पुकारला.बाजार तळावरून या आंदोलकांनी पारनेरच्या मुख्य बाजारपेठेतून एक भव्य रॅली काढली. या रॅलीदरम्यान आमचे पैसे आम्हाला मिळालेच पाहिजेत विजय औटी चोर आहे त्यांना अटक करा आणि संचालक मंडळाचा निषेध असो अशा घोषणांनी संपूर्ण शहर दणाणून गेले होते. ही रॅली थेट माजी आमदार विजयराव औटी यांच्या बंगल्यासमोर पोहोचली. तेथे संतप्त ठेवीदारांनी जोरदार निदर्शने केली. संस्थापक विजय औटी,



अनिकेत औटी, संस्थेचे अध्यक्ष रामदास भोसले, मुख्य कार्यकारी व्यवस्थापक रामदास झंजाड यांच्यासह संपूर्ण संचालक मंडळाला तात्काळ अटक करण्यात यावी, अशी मागणी यावेळी आंदोलकांनी लावून धरली.यावेळी ठेवीदार आंदोलक एकनाथ औटी, हरिभाऊ औटी, सिताराम दुधाडे, राजेश येवले, रवींद्र येवले, भीमसेन येवले, विश्वनाथ शिंदे, काकासाहेब काळे, प्रवीण आदमाने, ॲड. ऋषिकेश शिंदे आदी यावेळी उपस्थित होते.पोलीस प्रशासनाने गुन्हा दाखल करूनही आरोपी अद्याप मोकाट फिरत असल्याबद्दल ठेवीदारांनी तीव्र संताप व्यक्त केला. अनेकांच्या मुलांचे शिक्षण, मुलींची लग्ने आणि वृद्धांच्या औषधोपचाराचा पैसा या संस्थेत अडकल्याने ठेवीदारांवर उपासमारीची वेळ आली आहे. ही परिस्थिती मांडत असताना अनेक ठेवीदारांना अश्रू अनावर झाले होते. केवळ आश्वासने नको तर प्रत्यक्ष कारवाई करा, असा पवित्रा घेत ठेवीदारांनी पारनेर तहसील कार्यालय आणि पोलीस प्रशासनाकडे धाव घेतली.प्रशासनाला सादर केलेल्या निवेदनात ठेवीदारांनी मागणी केली आहे की, या घोटाळ्याचे तात्काळ फॉरेन्सिक ऑडिट करण्यात यावे आणि संस्थेसह सर्व माजी व विद्यमान संचालकांच्या वैयक्तिक मालमत्ता जप्त कराव्यात. या मालमत्तांच्या लिलावातून ठेवीदारांची देणी परत करण्याची प्रक्रिया सुरू करण्याची विनंती त्यांनी केली. तसेच गृह विभागाने या संस्थेवर प्रशासकाची नियुक्ती करावी, असेही निवेदनात नमूद केले आहे.

> आमच्या रक्ताचे पाणी करून आणि पोटाला चिमटा काढून जमा केलेला कष्टाचा पैसा या संस्थेने हडप केला आहे. आज आमच्यावर उपासमारीची वेळ आली असून, पोलीस प्रशासन मात्र आरोपींना उजळ माथ्याने फिरू देत आहे. आता केवळ कागदी घोडे नकोत, तर संस्थापक विजय औटींसह सर्व दोषींना तात्काळ अटक करून आमच्या मालमत्तांच्या लिलावातून आमचा एक-एक रुपया व्याजासह परत मिळालाच पाहिजे.
>
> **– राजेश येवले (पीडित ठेवीदार)**

सकाळपासून सुरू झालेले हे आंदोलन दुपारपर्यंत सुरू होते. यावेळी कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून पारनेर पोलिसांनी मोठा बंदोबस्त तैनात केला होता. तहसीलदारांनी ठेवीदारांच्या मागण्यांचे निवेदन स्वीकारून त्यावर योग्य कारवाई करण्याचे आश्वासन दिले आहे. मात्र, जर येत्या काही दिवसांत दोषींना अटक झाली नाही आणि पैसे मिळण्याची प्रक्रिया सुरू झाली नाही, तर हे आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा संतप्त ठेवीदारांनी दिला आहे. विधानसभेचे माजी उपाध्यक्ष व माजी आमदार विजय औटी यांच्या विरोधात पुकारलेल्या या आंदोलनामुळे पारनेर नगर तालुक्यासह संपूर्ण जिल्ह्यात मोठी खळबळ उडाली आहे.

# थोडक्यात

## आयकर विभागाकडून नवी मुंबईत आयकर अधिनियम २०२५ विषयावर जनजागृती कार्यक्रम




**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.२३, मुंबई :** ०१ एप्रिल २०२६ पासून लागू झालेल्या प्राप्तिकर कायदा, २०२५ च्या प्रमुख वैशिष्ट्यांची माहिती करून देण्यासाठी राबविण्यात येत असलेल्या देशव्यापी उपक्रमाचा एक भाग म्हणून, प्राप्तिकर विभाग, मुंबईच्या वतीने २१ एप्रिल २०२६ रोजी नवी मुंबईत एका जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. नवी मुंबईतील करदाते, सनदी लेखापाल, व्यापारी संघटना आणि विविध व्यावसायिक समुदायांचे प्रतिनिधी अशा समाजाच्या विविध स्तरांतील २५० हून अधिक व्यक्तींचा या कार्यक्रमात सहभाग होता. याप्रसंगी बोलताना, विभागाच्या मुंबई शाखेचे मुख्य प्राप्तिकर आयुक्त डॉ.विक्रम सहाय यांनी, नवीन कायदा करदात्यांसाठी अत्यंत फायद्याचा असून त्यामध्ये आणलेल्या सुलभता आणि सुसूत्रीकरणामुळे अनुपालनाचा खर्च कमी होणार असल्याचे सांगितले. हा कायदा आधुनिक काळाशी सुसंगत असण्यासोबतच त्याची सुव्यवस्थित रचना करण्यात आली असल्याने तो करदात्यांना आणि त्यांच्या प्रतिनिधींना उपयुक्त वाटेल आणि राष्ट्र उभारणीसाठी कर भरण्याचे त्यांचे कर्तव्य पूर्ण करण्यास त्याची मदत होईल.

प्रधान प्राप्तिकर आयुक्त डॉ.माया माहेश्वरी यांचे स्वागतपर भाषण झाले. सहाय्यक प्राप्तिकर आयुक्त शिल्पा खणीकर आणि मानस साहू यांनी नवीन कायद्यासंबंधीचे सादरीकरण केले. याप्रसंगी आयसीएआयच्या डब्ल्यूआयआरसीच्या नवी मुंबई शाखेचे संस्थापक अध्यक्ष ई.ए. पाटील, क्रेडाई- बीएएनएमचे उपाध्यक्ष चिराग शाह आणि ग्रोमाचे अध्यक्ष बी. भानुशाली हे देखील उपस्थित होते. दोन तासांच्या या सत्रात, सहभागींनी नवीन प्राप्तिकर कायद्यांतर्गत २०२६- २७ या आर्थिक वर्षात कर भरणे आणि विवरणपत्रे दाखल करण्याशी संबंधित विविध पैलूंविषयी अनेक प्रश्न विचारून त्याबद्दल खुलासा करण्याची मागणी केली. त्यांच्या प्रश्नांना प्राप्तिकर विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी उत्तरे देऊन त्यांचे शंकानिरसन केले. या कार्यक्रमाला विविध भागधारकांनी उत्साहवर्धक आणि उदंड प्रतिसाद देऊन त्याचे कौतुकही केले. पुढील काही महिन्यांत, करदात्यांपर्यंत आणि त्यांच्या प्रतिनिधींपर्यंत पोहोचण्यासाठी तसेच त्यांना नवीन कायद्यांतर्गत त्यांच्या भूमिका व जबाबदाऱ्यांबद्दल सजग करण्यासाठी मुंबईच्या विविध भागांमध्ये अशा अनेक कार्यक्रमांचे आयोजित करण्यासाठी मुंबई प्राप्तिकर विभाग कटिबद्ध आहे.

## बिलोली मार्गावरील चुंगी नाक्यासमोर पथदिवे नसल्याने अपघाताची शक्यता

**अक्षराज : दत्ता हमंद**

**दि.२३, कुंडलवाडी (नांदेड) :** शहरातून धर्माबाद व माचनूरहुन चुंगीनाक्याच्या चौकातून बिलोलीकडे व शाटकट मार्गे बोधन सगरोळीकडे जाणारा कधी स्वप्नातही विचार न केलेला रस्ता झाला आणि त्यामुळे तेलंगणा राज्य अगदी जवळ पडत आहे. यामुळे रहदारीत भरपूर प्रमाणात वाढ झाली आहे. दुचाक्या, अँटो, कार, मोटार व ट्रक यामुळेच अपघाताची दाट शक्यता वाढली असून तुरळक प्रमाणात भरपूर अपघात झालेले आहेत. पण ईश्वर कृपेने जिवीतहानी मात्र झालेली नाही. यामुळेच इकडे पथदिव्यासाठी लक्ष कुणाचे नाही. अन्यथा पथदिवे तेव्हाच बसवण्यात आले असते. पथदिवे त्वरित बसवा अशी मागणी आता जोर धरु लागल्याने या ठिकाणी विद्युत खांब आहेत. मात्र खांबावर बल्ब नसल्याने नागरिकांना रात्री गैरसोईचा सामना करावा लागत आहे. रात्रीच्या वेळी या ठिकाणी अंधाराचा साम्राज्य असल्याने तळीरामांसाठी उत्तम सोय आहे. तरी नगर परिषद प्रशासना तर्फे चुंगीनाका चौकात पथदिव्यांची सोय करावे, अशी मागणी शहर विकास प्रेमी नागरीकाकडून केली जात आहे. कुंडलवाडी येथील चुंगी नाका हा आता एक मोठा आणि महत्त्वाचा चौक झाला आहे. या चौकातून नागरिक, विद्यार्थी आणि वाहनांची सतत मोठ्या प्रमाणात वर्दळ ही चालूच असते. परंतु, अत्यंत खेदाने नमूद करावे लागते की, या मुख्य चौकात सध्या प्रकाश व्यवस्थेचा (लाईटचा) मोठा अभाव आहे. रात्रीच्या वेळी येथे पूर्णपणे अंधार असल्याने गंभीर समस्या निर्माण होत आहे. अपघाताची भीती चौक मोठा झाल्यामुळे आणि अंधार असल्यामुळे वाहने एकमेकांना दिसत नाहीत, परिणामी भीषण अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. नागरिकांची सुरक्षितता येणाऱ्या जाणाऱ्या पादचाऱ्यांना अंधारामुळे रस्ता ओलांडताना प्रचंड भीतीचे सावट आहे. अंधारात कोणाच्या अंगावरून गाडी जाण्याची किंवा गंभीर दुखापत होण्याची भीती सतत नागरिक व्यक्त करत आहेत. वाहतुकीची अडचण प्रकाश नसल्यामुळे वाहन चालकांना रस्ता आणि वळण यांचा अंदाज येत नाही, ज्यामुळे वाहतूक विस्कळीत होते. चुंगी नाका हा शहराचा मुख्य भाग असल्याने येथे तातडीने हायमॅक्स दिवा किंवा पुरेसे पथदिवे लावणे अत्यंत आवश्यक आहे. तरी नगर परिषद प्रशासनाने जनहिताचा विचार करून या ठिकाणी लवकरात लवकर प्रकाशाची व्यवस्था उपलब्ध करून द्यावी. अशी मागणी विकास प्रेमी नागरिकांकडून केली जात आहे.

## श्री शिवाजी विद्यालयात उन्हाळी छंद शिबिराचे उद्घाटन

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२०, बुलढाणा :** श्री शिवाजी विद्यालय तथा कनिष्ठ विज्ञान महाविद्यालय, बुलढाणा येथे दिनांक २३ एप्रिल ते ३० एप्रिल २०२६ या कालावधीत आयोजित उन्हाळी छंद शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य प्रमोद कावरे, पर्यवेक्षक नितीन ढोमणे, शिक्षकेतर प्रतिनिधी मांगे बाबूजी, क्रीडा शिक्षक संदीप पाटील उपस्थित होते. सर्वप्रथम या छंद शिबिराची सुरुवात डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. शिबिराचे उद्घाटन विद्यालयाचे प्राचार्य प्रमोद कावरे यांच्या हस्ते करण्यात आले.

शिबिराच्या पहिल्या दिवसाची सुरुवात योग व प्राणायाम करून करण्यात आली. क्रीडा शिक्षक श्री संदीप पाटील यांनी विद्यार्थ्यांना योग प्राणायाम याविषयी मार्गदर्शन केले. यानंतर कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री प्रमोद कावरे यांनी या उन्हाळी छंद शिबिराद्वारे विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव मिळेल. तसेच विद्यार्थ्यांचा शारीरिक, मानसिक, आणि सांस्कृतिक विकास होईल तसेच विद्यार्थ्यांच्या अंगी आत्मविश्वास निर्माण होईल असे सांगितले यानंतर विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. यानंतर विद्यार्थ्यांना अल्पोपहार देण्यात आला. या कार्यक्रम प्रसंगी विद्यालयातील सर्व विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. या छंद शिबिरामध्ये विद्यार्थ्यांना योग, प्राणायाम, चित्रकला, संगीत, नृत्य, बालसंस्कार वर्ग, आनंददायी खेळ, आरोग्य विषयक मार्गदर्शन, सामान्य ज्ञान इत्यादी विषयावर मार्गदर्शन करण्यात येणार आहे.